महत्त्वाचे

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डांगे

छत्रपती संभाजीनगर : जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर (शिक्षण विभाग) आयोजित दुसऱ्या शिक्षक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका आशा डांगे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे, असे जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाटकर-पानसरे यांनी एका निवेदनाव्दारे कळविले आहे. शाळांमध्ये अनेक गुणी साहित्यिक, कवी, कलावंत शिक्षक आहेत. या शिक्षकांच्या साहित्यप्रतिभेला आणि कलेला अधिकचा वाव मिळावा, लिहित्या हातांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने हे शिक्षक साहित्य संमेलन आयोजित करण्यात येते.आशा डांगे या बळीराम पाटील विद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे गेल्या २७ वर्षापासून सहशिक्षिका म्हणून कार्यरत असून शिक्षणशास्त्र विषयात पी.एचडी. करत आहेत. बालभारती, पुणे यांच्या कार्यानुभव व मराठी विषयाच्या पुस्तकांच्या समीक्षण समितीत त्या कार्यरत होत्या.

सिल्लोडमध्ये आढळला दुर्मिळ साप

सिल्लोड : शहरातील यशवंतनगर परिसरात दुर्मिळ नायकुळ बॅडेड रेसर साप आढळून आला. आपल्या परिसरात दुर्मिळ असलेल्या या सापास शहरातील वन्यजीव संवर्धक डॉ. संतोष पाटील यांनी पकडले.बिन विषारी असलेल्या या सापाचा गव्हानी रंग असून, त्याची लांबी दीड मीटर, अत्यंत चपळ असलेल्या हा साप नागीणसारखा व अंगावर बारीक चेक्सची नक्षी तसेच संकटकाळी नागीण सारखे तोंड फुगवून नाग असल्याचा भास निर्माण करतो, अशी माहिती डॉ. पाटील यांनी दिली. या सापाची डॉ. पाटील यांनी जैवविविधता नोंद हेतू झुलॉजिकल सोसायटी ऑफ इंडियाच्या पोर्टलवर नोंद केली आहे. या सापाला त्यांनी आव्हाना (ता. भोकरदन) परिसरातील वनअधिवासात सोडून दिले.

परीक्षार्थींना प्रोत्साहन द्या!

छत्रपती संभाजीनगर : तुमच्या घरात कोणी दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षेची तयारी करत असेल, तर तुम्हीही घरातील वातावरण आरोग्यपूर्ण, संतुलित आणि आनंदी राहील, यासाठी प्रयत्न करा. परीक्षार्थींना अभ्यासाचा ताण येणार नाही, परीक्षेची भीती वाटणार नाही, यासाठी आजूबाजूचे वातावरण प्रसन्न ठेवा. परीक्षेत इतकेच गुण किंवा टक्के मिळायलाच हवेत, असा अट्टहास पालकांनी सोडावा आणि परीक्षार्थींचे प्रोत्साहन वाढविण्याचा प्रयत्न करावा, असा सल्ला मार्गदर्शकांनी दिला आहे. राज्यातील ३१ लाखांहून अधिक विद्यार्थी सध्या दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षांची तयारी करत आहेत. याबाबत समुपदेशक श्रीराम गीत म्हणाले,विद्यार्थ्यांनी पेपरला जाताना निकालाचा विचार मनात अजिबात नको. घरी आल्यानंतर पालकांनी पेपर कसा गेला याची चिरफाड करण्यात वेळ घालवू नये, असाही सल्ला त्यांनी दिला.

धनंजय मुंडेंचे गहिनीनाथाला साकडे

बीड : सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील राजकीय,सामाजिक वातावरण बिघडले आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलने केली जात आहेत. या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे आज संत वामन भाऊ यांच्या ४९ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी बीड जिल्ह्यातील समाजिक एक्य आणि जातीय सलोखा कायम रहावा यासाठी प्रार्थना केली. बीडच्या पाटोदा तालुक्यातील गहिनीनाथ गड येथे संत वामनभाऊ यांचा ४९ वा पुण्यतिथी सोहळा साजरा केला जात आहे. मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते आज शासकीय महापूजा झाली. मात्र यामध्ये पंकजा मुंडे यांची अनुपस्थिती चर्चेचे कारण ठरली. महापूजेनंतर धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांनी बनवल्या ६ हजार फायली

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कमवा आणि शिका योजनेच्या विद्यार्थ्यांनी दहा हजार ऑफिस फोल्डर (पॅड) आणि सहा हजार फाइल्स तयार करून त्याचा विद्यापीठ प्रशासनाला पुरवठा केला आहे. तर, तयार केलेल्या चार हजार पैकी दोन हजार सॅनिटरी नॅपकिन विविध विभागांत पुरवण्यात आल्या आहेत. मागणीनुसार या साहित्याचा पुरवठा कमवा शिका विभागाकडून केला जात आहे.आर्थिकदृष्ट्या कमकुवत आणि गरजू ५८६ विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका या योजनेचा यावर्षी विद्यापीठाने आधार दिला आहे. यात विद्यार्थिनींची संख्या २४६ असून विद्यार्थ्यांची संख्या ३४० आहे. मुलींचे प्रमाण ४२, तर ५८ टक्के विद्यार्थी आहेत. त्यांना दोन तासांच्या श्रमाचे प्रतिदिन मानधन १०० रुपये दिले जाते. कमवा शिका योजनेत गजानन पालकर, गौतम सोनवणे या कर्मचाऱ्यांच्या देखरेखीत विद्यार्थ्यांकडून दैनंदिन कामे दररोज सकाळी सात ते नऊ वाजेदरम्यान करून घेतली जातात.

चोरीचे ६३ मोबाईल जप्त; १ जण ताब्यात

अंबाजोगाई : येथील बसस्थानकात एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिस तेजस वाहुळे यांनी पाठलाग करून त्याला पकडले. यावेळी त्याच्याजवळ चोरीचे ६३ मोबाइल आढळले. मात्र, त्याचे इतर तीन साथीदार फरार झाले. मंगळवारी, दि.२१ रोजी दुपारी ही घटना घडली. बीड पोलिस मुख्यालयातील पोलिस कर्मचारी तेजस वाहुळे हे साप्ताहिक सुटी असल्याने अंबाजोगाईत आले होते. दुपारी मुलाची शाळा सुटेपर्यंत वाट पाहत ते बसस्थानकात थांबले होते. यावेळी एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने तो पाकीटमार किंवा मोबाइलचोर असावा, असा संशय त्यांना आला. त्यामुळे त्यांनी त्याच्यावर पाळत ठेवली.

बनावट नोटा प्रकरणातील मनीष क्षीरसागर जेरबंद

बीड पोलिसांची पुण्यात कारवाई; मकोका लागणार

बीड : प्रतिनिधी

जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच देशमुख हत्या व खंडणी प्रकरणा नंतर आणखीन एका प्रकरणी आठवले गँगच्या विरूद्ध मकोका लागणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत असून बनावट नोटा छपाई प्रकरणी बीड पोलिसांनी ही मोठी कारवाई केली आहे. आठवले गँगसोबत सावलीसारखा राहणाऱ्या मनीष क्षीरसागरच्या घरात तीन महिन्यांपूर्वी बनावट चलनी नोटांचा कारखाना मिळून आला होता. यामध्ये बीड शहर पोलिसांनी प्रमुख आरोपीस अटक केली होती. मात्र, यातील मनीष क्षीरसागर हा तेव्हापासून पोलिसांना गुंगारा देत होता. दरम्यान, बार्शी नाक्यावरील डोंगरे कुटुंबावरील खुनी हल्ल्यामध्ये पुन्हा मनीष क्षीरसागर याचा सहभाग निश्चित झाला आणि स्थानिक गुन्हे शाखेने त्याला पुणे येथून उचलले.

पुणे येथे बनावट चलनी नोटांमध्ये सहभागी असलेल्या मनीष क्षीरसागर याच्यासोबत अक्षय आठवले आणि ओंकार सवाई हे सुद्धा सोबत मिळून आले होते. तेव्हाच बीड शहर पोलिसांनी बनावट चलनी नोटांच्या गुन्हे तपासासंदर्भात सावध होऊन त्या दिशेने तपास करण्यास सुरवात केली होती.

यावरून आयत्या तावडीत सापडलेल्या मनीष क्षीरसागर याचा कोटार्मार्फत बीड शहर पोलिसांनी जेलमधून त्यांचा ताबा घेतला. पोलिसांच्या तावडीत सापडल्यावर मनीष क्षीरसागर याने पोलिसांना सर्व माहिती दिली. अक्षय आठवले यांनी बनावट चलनी नोटा चलनात आणण्यासाठी पुणे येथे असलेल्या प्रविण गायकवाड यास पिस्तूल पुरविले होते. तसेच, पळून जाताना मनीष क्षीरसागर याला सोबत घेऊन जाऊन छत्रपती संभाजीनगर येथे लपवले होते.

सनी आठवले यांनीसुद्धा यातील आरोपींना शरण देऊन अक्षय आठवले मार्फत संरक्षण पुरवले होते. पोलिसांना गुन्ह्यात वापरलेला मनीष क्षीरसागर याचा मोबाइल मिळाला आहे. या माध्यमातून आणखी पुरावे या गँगच्या विरुद्ध पोलिसांना मिळणार आहेत.

या प्रकरणामध्ये संघटित गुन्हेगारी उघड

दरम्यान बनावट नोटा छपाई मध्ये संघटित गुन्हेगारी ही उघडकीस आली असून बीडचे पोलीस अधीक्षकांनी या गुन्ह्यात मकोका लावण्या संबंधित पोलीस महासंचालक यांच्याकडे प्रस्ताव पाठविल्याचे समजले असून एक दोन दिवसात या प्रस्तावास महासंचालक मान्यता देतील.या प्रकरणांमध्ये पोलीस अधीक्षक श्री नवनीत कांवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंबर गोलड्ये यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहायक पोलिस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, सुषेंन पवार, सचिन अलगट, यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

छ. संभाजीनगरमध्ये दिसणार २३ मजली इमारत

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

शहरात आता २३ मजली उंच इमारती दिसणार आहेत. नवीन विकास नियंत्रण नियमावलीनुसार छत्रपती संभाजीनगर शहरात ७० मीटर उंचीपर्यंतच्या इमारती बांधण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार महापालिकेच्या नगररचना विभागाने शहानूरवाडी भागात तब्बल २३ मजली इमारतीला बांधकाम परवानगी दिली आहे. यापूर्वी शहरात १५ मजली उंच इमारत पडेगाव भागात उभारण्यात आली होती. आता शहानूरवाडी भागातील २३ मजली इमारतीत सर्वांत उंच ठरणार आहे.

शहरात गगनचुंबी इमारती उभारती उभ्या राहाव्यात यासाठी शासनाने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये बदल केला आहे. त्यानुसार ७० मीटर उंच म्हणजे २३ मजल्यांपर्यंत इमारती उभारल्या जाऊ शकतात, मात्र आतापर्यंत १५ मजले एवढी एकच उंच इमारत बांधण्यात आलेली आहे.

मारहाण प्रकरणी पोलिसांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

२०२१ मध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये पद आणि कायद्याचा गैरवापर करून तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे आणि ग्रामीण पोलीस दलातील पोलीस कॉन्स्टेबल अंकुश दौड यांनी एका ज्येष्ठ नागरिकास मारहाण केली होती. या प्रकरणी मारहाण झाल्यालेल्या नागरिकाने संबंधित पोलिसांवर कारवाई करण्यात यावी या संदर्भात पोलीस आयुक्तांकडे तक्रार केल्यानंतरही न्याय मिळत नसल्याने या ज्येष्ठ नागरिकाने आत्मदहनाचा इशारा देताच तीन वर्षानंतर हर्सूल पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरच्या हर्सूल येथील एका सोसायटीत दत्तात्रय पांडुरंग ठोंबरे हे ज्येष्ठ नागरिक वास्तव्यास होते. त्याच ठिकाणी ग्रामीण पोलीस दलातील पोलीस कॉन्स्टेबल अंकुश दौड राहत होता. त्यांनी ठोंबरे यांच्याविरुद्ध सोसायटीतील लोकांकडून खोटे गुन्हे दाखल करून घेतले. शिवाय एका महिलेस विनयभंगाचा खोटा गुन्हा दाखल करण्यास सांगितला. त्यानंतर १४ मार्च २०२१ रोजी तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक नितीन कामे हा घरी आला.

कारची दुचाकीला धडक; महिलेचा मृत्यू

सिल्लोड : तालुक्यातील निल्लोड फाट्यावर वळण रस्त्यावर दुचाकीस कारने पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला. तर दुचाकीस्वार आणि मुलगा गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात आज, बुधवारी दुपारी १ वाजता जळगाव ते छत्रपती संभाजीनगर रस्त्यावर निल्लोड फाट्यावर झाला.

सिल्लोड येथील जावेद भिकन बागवान हे दुचकीवरून पत्नी शाबानाबी जावेद बागवान आणि मुलगा अमर जावेद बागवान यांच्यासोबत छत्रपती संभाजीनगर येथून सिल्लोडकडे येत होते.

मालमत्ता कार्ड कर्जासाठी वैध दस्तऐवज

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे बँकाना निर्देश

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी

स्वामित्व योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या मालमत्ता कार्डावर बँकांना संबंधित मालकास अर्थसाह्य देता येते. त्यातून ग्रामीण भागातील लोक आपल्या व्यवसायासाठी कर्ज घेऊ शकतात, याबाबत बँकांनी अंमलबजावणी करावी, मालमत्ता कार्ड हे वैध दस्तऐवज आहे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी बँक अधिकाऱ्यांना दिले आहेत.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात सोमवारी दि. २० जानेवारी रोजी जिल्हा सल्लागार व समन्वय समितीची बैठक पार पडली. रिजर्व बँकेचे अमितकुमार मिश्रा, बँक ऑफ महाराष्ट्रचे क्षेत्रिय प्रबंधक विवेक नाचणे, 'नाबार्ड' चे विभागीय अधिकारी सुरेश पटवेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अशोक सिरसे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे मनोहर वाडकर, सज्जय जहीर हुसेन, ओबीसी महामंडळाचे व्यवस्थापक जगन्नाथ राठोड, माविमचे समन्वयक चंदनसिंग राठोड, दुग्धविकास अधिकारी मनीषा हराळ मोरे, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक समाधान सूर्यवंशी, वसंतराव नाईक महामंडळाचे व्यवस्थापक वैभव घोडके तसेच सर्व बँकांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

नियम पायदळी तुडवित रस्त्याचे काम

कंत्राटदारांची मनमानी; संबंधित विभागाचे दुर्लक्ष

सिल्लोड : प्रतिनिधी

आमठाणा, गोळेगाव ते पानवडोद बुद्रुक असे रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम सुरू आहे. यासाठी खोदकाम करताना कंत्राटदारांनी रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची माहिती न देता त्यांच्या शेतातून खोदकाम केले असून, वन विभागाची परवानगी न घेता रस्त्यालगतची झाडेदेखील तोडण्यात आली आहेत. दरम्यान कंत्राटदार ऐवढ्यावरच न थांबता येथील पाझर तलावातून हजारो ब्रास मुरुमाचे उत्खनन कुठल्याही विभागाची परवानगी न घेता रस्त्यावर मुरुमाची भरती केली जात आहे, या धक्कादायक प्रकाराकडे मात्र, संबंधित विभागाने डोळेझाक केली आहे.

दरम्यान, रस्ता रुंदीकरणाचे काम शासकीय नियम पायदळी तुडवित सर्रासपणे सुरू आहे. याप्रकरणी जिल्हा परिषद सिंचन विभागाच्या अधिकाऱ्यांना मुरुमाचे उत्खनन करण्यासाठी तुमच्या विभागाची परवानगी घेतली आहे का, अशी विचारणा केली असता त्यांनी अद्याप या तलावाची देखभाल करण्यासाठी आमच्याकडे जलसंधारण स्थानिक स्तर विभाकडून हस्तांतरण करण्यात आले नसल्याचे उत्तर दिले.

तर, तहसील कार्यालयात कंत्राटदाराने मुरुमाची वाहतूक करण्यासाठी रॉयल्टी संदर्भात माहिती घेतली असता याविषयी कुठलीच माहिती नसल्याचे उत्तर मिळाले. शिवाय झाडे तोडल्याविषयी अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष धोडगे यांना विचारणा केल्यानंतर झाडे तोडण्यासाठी कंत्राटदाराने कुठलीही परवानगी न घेता झाडे तोडल्याचे सांगितले. याप्रकरणी पंचनामा केला असून, हे काम थांबविण्यात आल्याची खोटी माहिती दिली. प्रत्यक्षात मात्र काम सुरूच आहे. त्यामुळे कंत्राटदारावर प्रशासनाची मेहरबानी असल्याने येथील शेतकरी संतप्त झाले आहेत.

केज : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीमुळे सध्या राज्यातच नाही तर देशभरात जिल्ह्याचे नाव चर्चेत आले आहे. असे असताना देखील जिल्ह्यात सर्रास गुन्हे उघडकीस येत आहेत. आता चक्क आम्ही पोलीस असून तुमच्या गळ्यातील सोन्याचे दागिने काढून ठेवा असे म्हणून एका महिलेला दागिने काढण्यास सांगून हातचलाखी करून १ लाख २० हजार रुपये किमतीचे मिनी गंठण व कानातील झुंबर असे दागिने घेवून भामट्यांनी धुम ठोकली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज दिनांक २२ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास रामकंवर उर्फ अनिता शंकर राऊत वय ५० वर्ष ही महीला केज-कळंब रोड जवळील साई नगर येथील धुणी-भांड्याचे काम आटोपून विठाई पुरमकडे जात असता, समोर एक व्यक्ती ऊभा होता.

पोलिस असल्याचे सांगून सोन्याचे दागिने लांबविले

ढगाळ वातावरणामुळे हरभरा, मिरचीवर रोग

जालना : प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून जालना जिल्ह्यात ढगाळ वातावरण आणि दाट धुके दिसून येत आहे. या धुक्यामुळे हरभरा पिकावर अळी आणि मर रोगांचा प्रादुर्भाव पडला आहे. यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर दुसरीकडे हिरवी मिरचीवर रोगाचा प्रादुर्भाव पडलेला पाहण्यास मिळत आहे.

मागील काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल होत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. वातावरण बदलाचा परिणाम रबी हंगामातील पिकांवर होत असल्याचे पाहण्यास मिळत आहे. प्रमुखाने पिकांवर रोगराई पसरत आहे. याचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. दरम्यान २६ जानेवारीपर्यंत जालना जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहणार असल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. यामुळे शेतकरी हैराण झाले असून फवारण्या करण्यात येत आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी शेतकऱ्यांनी हरभऱ्याचे लागवड जास्त केली होती. मात्र सततच्या बदलत्या वातावरणामुळे रोगांचा प्रादुर्भाव होत आहे.

एल्&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल्&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल्&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 00 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: औरंगाबाद

L&T Finance

गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी सार्वजनिक लिलाव

एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 [54 ऑफ 2002] आणि या कायद्यांतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा लिलाव करत आहे. **"आधार कुठे आहे" आणि "जशी स्थिती आहे तशी"** त्याची देय रक्कम आणि पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **"सार्वजनिक लिलाव"** च्या मार्गाने.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 21.01.2025 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. शंतनु किसवे 2. शोभा श्रीपादराव किसवे 3. इंटिग्रिटी सर्व्हिसेस (तिचे मालक शंतनु किसवे यांच्या मार्फत)	अशा मालमत्तेचे सर्व भाग आणि खंड जिचा पत्ता आहे : रो हाऊस क्र. 01, अधिमापन चटई क्षेत्रफळ 33.07 चौ.मी. आणि बांधकाम क्षेत्रफळ 44.649 चौ.मी., भूखंड क्र. 124 अधिमापन 47.50 चौ.मी. शिवम पार्क, शेंद्र जहांगीर, औरंगाबाद 431007	H00841311220045951, H00841311220062559	15 नोव्हेंबर 2024	रु. 89,848/-	रु. 34,87,066.41/-	रु. 8,98,485/-	सर्व कामकाजांच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 पूर्वनियोजित भेटीसह.	27/02/2025 दुपारी 12.00 ते दुपारी 2.00

सीमारेषा	
पूर्व	9 मीटर रुंद रस्ता
पश्चिम	प्लॉट क्र. 137
उत्तर	प्लॉट क्र. 125 (रो हाऊस क्र. 2)
दक्षिण	प्लॉट क्र. 123

सावजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **26/02/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी एलटीएफ द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **27/02/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **28/02/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या परीक्षणासाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार प्राधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात ज्याचे नाव : **शेखर काळे, एल & टी फायनान्स लि. 1ला मजला, रत्नप्रभा कॉम्प्लेक्स, जालना रोड, औरंगाबाद - 431001 आणि संतोष तिवारी, एल & टी फायनान्स लि. - ऑफिस : 6वा मजला, वृंदावन इमारत, प्लॉट क्र. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सीडीस शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098. संपर्क क्र: 022 - 68076666.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, प्राधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता किंवा कोणतीही पूर्व सूचना न देता बोली/प्रस्ताव स्वीकारू/नाकारू/बदलू/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 23.01.2025
ठिकाण: औरंगाबाद

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल्&टी फायनान्स लिमिटेड